Localdisc (E) niyatran/ 1960

# कार्यालय, सहाय्यक निबंधक सहकारी संस्था ता.भुम

दुरध्वनी क्रमांक ०२४७८ २७२०१३ ईमेल आयडी - arbhoom@gmail.com

108 जा.क्र./नियंत्रण/निवड/प्रा.अधि/नेमणुक/२०१७ दिनाक : 16 /०३/२०१७

**वाचा :-** १. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कब पोटकलम (१४) व ७३ आय (१) (२) व ७७ अ
२ या कार्यालयाचे आदेश जा.क्र. ६६, दिनांक २३/०२/२०१७

**प्रस्तावना:-**

ज्याअर्थी वाचा क्र.०१ मधील तरतुदीनुसार संस्थेने समितीची मुदत संपण्यापुर्वी कलम ७३ कब च्या पोटकलम (१४) मधील तरतुदीनुसार मा.राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणाला ,तिची मुदत संपण्यापुर्वी किमान सहा महिन्यापुर्वी आपला पदावधी संपण्याबाबत कळवील;

राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या दिनदर्शिकेनुसार राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाला आवश्यक असणा-या अशा नोंदवहया अभिलेख, आणि माहिती पुरविल याबाबत बुध्दीपुरस्पर समितीने निवडणुक घेण्यास कसुर केल्यास. समितीचे सदस्य त्याचे अधिकारपद धारण करण्याचे बंद करतील अशा परस्थितीत निबंधक कलम ७७ अ अन्वये योजिल्याप्रमाणे कारवाई करील .अशी तरतुद आहे.

ज्याअर्थी **विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या.देवळाली** ता.भुम या संस्थेची संचालक मंडळाची मुदत दिनांक :- ०४/०४/२०१६ रोजी संपलेली असल्याने वाचा क्र ०२ नुसार संस्थेची निवडणुक प्रक्रिया पुर्ण करण्याकरिता निवडणुक निर्णय अधिकारी यांची नेमणुक करुन संस्थेस प्रारुप मतदार यादीसोबत आवश्यक प्रमाणपत्र व निवडणुक निधी उपलब्ध करणेबाबत सुचित करण्यात आले आहे.

ज्याअर्थी उपरोक्त कायदयातील तरतुदीनुसार मतदार यादी व निवडणुक निधी तसेच आवश्यक माहिती या कार्यालयास पुरविली नाही. त्यामुळे मुदत संपण्यापुर्वी समितीची निवडणुक घेता आली नाही.

त्याअर्थी संस्थेची निवडणुक कामकाज पुर्ण करण्यासाठी मी खालीलप्रमाणे खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

मी एस ए.गोगले ,सहाय्यक निबंधक सहकारी संस्था भुम महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे **कलम ७७ अ (२) (३)** अन्वये योजिल्याप्रमाणे प्राप्त अधिकाराचा वापर करुन विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या.देवळाली ता.भुम या संस्थेचे संचालक मंडळ निष्काषित करुन संस्थेचे प्राधिकृत अधिकारी म्हणुन श्री.ए.के.मोहिते.,शाखातपासणीस उजिम सह बॅक लि.उबाद शाखा माणकेश्वर यांची नियुक्ती करीत आहे.

(एस.ए.गोगले)
**सहाय्यक निबंधक**
**सहकारी संस्था ता.भुम**

**प्रत,**

१. सचिव, विविध कार्यकारी सेवा सहकारी संघ मर्या.देवळाली ता.भुम यांना माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव
२. चेअरमन / समिती सदस्य , विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या.देवळाली ता.भुम यांना देवुन कळविण्यात येते कि या आदेशानुसार आपले अधिकारपद रद्द झाल्याने संबंधीत प्राधिकृत अधिकारी यांचेकडे संस्थेचा पद्भार सुपुर्त करावा.
३. श्री.मोहिते ए.के. प्राधिकृत अधिकारी यांना देवुन कळविण्यात येते कि, सदर संस्थेचा पद्भार घेवुन संस्थेच्या निवडणुक प्रक्रिया पुर्ण करण्याकरिता आवश्यक ती कार्यवाही करावी.
४. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था ,उस्मानाबाद यांना माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव सविनय सादर.
५. शाखाधिकारी,उबाद जिल्हा मध्य. सह बॅक लि., शाखा माणकेश्वर

**सहाय्यक निबंधक**
**सहकारी संस्था ता.भुम**